MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

International Multilingual Research Journal

# Vidyawarta®

Issue-21, Vol-15, Jan. to March 2018

RESEARCH

EDUCATION

TEAMWORK

LEARNING

Editor
Dr.Bapu G.Gholap

ANNIVERSARY CELEBRATIONS 6th ANNIVERSARY 2018

Scanned by CamScanner

25) Some Reflections on the Gandhian Idea of Ideal Social Order: An....
Dr. Viplav, Sikandrabad, Bulandshahar || 112

26) CRITICAL ANALYSIS OF TONI MORRISON'S NOVEL *JAZZ*
Dr. Subhash S. Waghmare, Mantha, Jalna, M.S. || 118

27) The Current scenario of Food Processing Industry in India
Warghade Janardhan Bhau, Mokhada, Dist. Palghar || 120

28) Cashless India is a need of hour: Challenges & Opportunities
DINESH YADAV, Allahabad || 122

29) CHALLENGES & OPPORTUNITIES: LEARNING DISABLED;WITH COMMUNICATION
Dr. Munshi Lal Yadav, Hazaribag, Jharkhand. || 128

30) प्राचीन खानदेश
डॉ. भामरे नानाजी दगा, अक्कलकुवा, जि. नंदुरबार (महाराष्ट्र) || 133

31) ऊसतोड कामगार : चिकित्सक अभ्यास
प्रा. जाधव शामल भिवराव-डॉ. प्रा. वैरागडे उज्वला, (महाराष्ट्र) || 136

32) ग्रामीण साहित्याचा मानबिंदू:डॉ.आनंद यादव
प्रा.डॉ.महावीर विठ्ठल कांबळे, ता.कराड जि.सातारा || 141

33) ज्ञानदेवांचे अंधविश्वासाला विरोध करणारे विचार
प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे, औरंगाबाद || 144

34) हिंदी दलित रंगमंच
डॉ. भानुदास आगेडकर, वाई || 153

35) जम्मू कश्मीर का विवाद:एक त्रासदी
डॉ० निधि रायजादा–अनुतोष कुमार, बादलपुर (गौतमबुद्धनगर) || 157

36) तुलसीदास कृत 'गीतावली' में अप्रस्तुत विधान
डॉ. अशोक पंकज, लमीनी, पठानकोट || 159

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

31

# ऊसतोड कामगार : चिकित्सक अभ्यास

**प्रा. जाधव शामल भिवराव**
गृहविज्ञान विभाग
मिल्लिया महाविद्यालय, बीड.

**डॉ. प्रा. वैरागडे उज्वला**
गृहशास्त्र विभाग, प्रमुख (निवृत्त)
इं.भा.पा. महिला महा. विद्यालय औरंगाबाद.

**********

**सारांश (Abstract) :**

महाराष्ट्रातील एकूण सहा प्रशासकिय विभागपैकी मराठवाडा बीड, उस्मानाबाद, लातूर नांदेड हिंगोली, परभणी जालना व औरंगाबाद या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. औरंगाबाद शहर हे या विभागाचे प्रशासकिय मुख्यालय आहे. मराठवाड्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६३ हजार ७७३ चौ. कि.मी. असून २०११ च्या भारतीय जनगननेप्रमाणे १ कोटी ८७ लाख एवढी लोक संख्या आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्याच्या सुमारे २१ टक्के क्षेत्र व्यापले असून सुमारे १७ टक्के लोकसंख्या आहे.

मराठवाड्याचा सुमारे ३०% भाग पर्जन्य छायेच्या प्रदेशात येत असून येथील कोरडवाहू जिरायती शेतीचे प्रमाण ८५% एवढे आहे. कृषी हेच येथील लोकांच्या निर्वाहाचे मुख्य क्षेत्र आहे. मराठवाड्याचा गतकाळ वैभव संपन्न होता. परंतू निजामाच्या काळात व नंतर द्विभाषीक व संयुक्त महाराष्ट्र निर्मिती पाश्चात या विभागांच्या वैभव संपन्नतेला अवकळा आली. त्यात आणखी भर पडली. ती महाराष्ट्रातील राजकिय नेतृत्वाचा मराठवाड्याच्या विकासाबाबतचा दृष्टीकोन याचा प्रतिकूल परिणाम येथील उदयोग, शेती, जलसिंचन प्रकल्प आणि वाहतुक व दळणवळण यांच्यावर झाला.

महाराष्ट्रातील सुमारे १३ ते १५ लाख ऊसतोड कामगारापैकी जवळपास ५ ते ६ लाख ऊसतोड कामगार हे मराठवाड्यातील असून ते ऑक्टोबर ते नोव्हेंबर ते एप्रिल में या सात महिन्याच्या हंगामी काळात स्थलांतर करतात. तसेच त्यांचा मुक्काम कामाच्या ठिकाणी अर्थात ऊसशेतीजवळ असतो. ऊसतोड कामगारांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधा व जीवनावश्यक वस्तुंची सहज उपलब्धता होत नसल्याने त्यांना अनेक गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यात ही भरीस भर म्हणजे ऊसतोडीचा कालावधी हा विषम हवामानाचा असतो. नोव्हेंबर जानेवारी हा कडक थंडीचा काळ हिवाळा तर फेब्रुवारी में दरम्यानचे दिवस तीव्र उष्णतामान (उन्हाळा) असते. अशाप्रकारे कडक हिवाळा व उष्ण उन्हाळा अशी अत्यंतिक विषम हवेची स्थिती ऊसतोड कामगारांच्या आरोगय व कार्यक्षमतेच्या दृष्टीने बाधक ठरते. तसेच ऊसतोडणीचे काम एकाच ठिकाणी कायम स्वरूपी नसलयाने त्यांना त्यांच्या सर्व कुटूंबियांसह सतत स्थानिकरित्या किंवा साखर कारखाना परिक्षेत्रात स्थलांतर करवे लागते.

**(Key Words) बीज संज्ञा :** हंगामी स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या सामाजिक समस्या.

**प्रस्तावना (Introduction) :**

आज मराठवाडा असे ज्या प्रदेशास संबोधले जाते त्याची जडणघडण इ.सन १८२९ पर्यंत होत होती. या प्रदेशाला मराठवाडा असे संबोधने इ.सन १८६४पासून रूढ झाले. इ.स. १८७० मध्ये हैद्राबाद संस्थानाचा मुख्यमंत्री सर सालार जंग (प्रथम) याने राज्याची नव्याने पूनर्रचना केली. तयात जो मराठी भाषीकांचा औरंगाबाद सुभा निर्माण करण्यात आला त्यालाच "मराठवाडा" असे नाव दिले गेले.

इ.स. १९४८ पर्यंत मराठवाडा हा इस्लामी राजवटीखाली होता. ब्रिटीशांच्या आमदाणीपूर्वी मराठवाडा हा भूप्रदेश निजामांच्या संपूर्ण ताब्यात कधीही नव्हता जया आठ जिल्ह्यांना मिळून एकत्रीतरित्या आज 'मराठवाडा' म्हणून ओळखले जाते. त्यापैकी नांदेड हा संपूर्ण जिल्हा, बीड जिल्ह्याचा निम्मयापेक्षा अधिक भाग, उस्मानाबाद जिल्ह्यातील तीन तालुके, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुका व जालना जिल्ह्यातील जालना, जाफ्राबाद तर औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगांव तालुके हे पेशवाई पतन होईपर्यंत त्यांच्याकडेच (पेशव्याकडे) होते. असे तात्कालीन इतिहासाच्या साधन सामुग्रीवरून स्पष्ट होते.

"गोड ऊसाची कडू कहाणी" म्हणून स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या समस्येकडे पहाता येईल कारण साखर निर्मिती व उत्पादनासाठी सगळ्यात महत्वाचा घटक म्हणजे ऊसतोड कामगार वर्ग होय. या ऊसतोड स्थलांतरित कामगारांच्या आर्थिक व कौटूंबिक समस्या एवढ्या दाळ व प्रचंड आहेत की, त्या समस्येतच तो चिरडला जात आहे.

"There is bitter story of sweet sugar Market. The Sugarcane harvesting migrants cut the sugarcane to make sugar but at the same time



Scanned by CamScanner

they themselves faces numbers of the problems and get themselves crush."

ऊसतोड कामगारांचे स्थलांतर हे प्रामुख्याने तुलनात्मकदृष्ट्या कमी विकसीत प्रदेशाकडून जास्त विकसीत प्रदेशाकडे होताना आढळते. मराठवाडा हा प्रशासकिय विभाग पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून तो भौगोलीकदृष्ट्या पर्जन्यछायेच्या विभागात (Rain Shadow Zone) मोडतो. तसेच मराठवाडा हे 'आवर्षण-प्रवण क्षेत्र' (Draught Prone Area) असून येथे दर दहा वर्षांने एक मोठा कोरडा दुष्काळ पाहावयास मिळतो. त्याचा प्रत्यक्ष परिणाम येथील शेती व पीक उत्पादनावर होतो. पीणमी येथील शेतकरी हा आर्थिक संकटात सापडून गरिबीचे व हालखिचे जीवन जगतो.

या उलट पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर व पूणे जिल्ह्यातील कृषीची व शेतकऱ्यांची स्थिती अनुभवास येते. पश्चिम महाराष्ट्रातील बारमाही वाहणाऱ्या नदया, सुपीक मृदा, पोषक हवामान, बँका व सहकारी संस्थांचा विकास यामुळे शेती व शेतीपूरक धंदयामुळे तेथील शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीची झळ बसत नाही. शिवाय महाराष्ट्रातील प्रभावी राजकिय नेत्यांच्या धोरणातून त्या प्रदेशातील जलसिंचन प्रकल्प व अनेक ठिकाणच्या कोल्हापूर टाईप बंधाऱ्याच्या (KT वेअर्स) निर्मीतीमुळे तेथील शेती समृध्द झाली आहे. मराठवाड्यातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि बेरोजगार वर्ग कामासाठी पश्चिम महाराष्ट्रातील सधन ऊस उत्पादन क्षेत्राकडे ऊसतोड कामगार म्हणून विशिष्ट काळासाठी स्थलांतर करू लागला. ही ऊसतोड कामगारांच्या स्थलांतराची परंपरा १९७१-७२ सालापासून आजतागायत कायम टिकून आहे.

मराठवाड्यातील बहुजन समाजातील शेतमजूर व अल्पभूधारक शेतकरी व कष्टकरी 'ऊसतोड कामगार' (Sugarcane Cutters) म्हणून प्रसिध्द आहेत. या लोकांच्या उपजिवीकेचे/ उदरनिर्वाहाचे पारंपारीक साधन म्हणजे वनोत्पादने गोळा करणे, पशूपालन व त्या अनुषंगाने दुग्धोत्पादन असल्याने त्यांचा हळू-हळू शेतीशी संबंध येऊन ते शेतमजूर व अल्पभूधारक शेतकरी ही बनले असावेत असे मानले जाते. मराठवाड्यातील हा शेतमजूर व अल्पभूधारक अशिक्षित व अंधश्रध्दाळू शेतकरी या भागातील दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडला याचा परिणाम म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील सधन ऊसशेतीच्या विशेषत: ऊसतोडीच्या कामासाठी आकर्षित झाला. पुढे त्याची ओळख 'ऊसतोड कामगार' अशी झाली. यामध्ये वंजारी, बंजारा (लमाण) मराठा (कुणबी), धनगर, भिल्ल इत्यादी जातींचा नामोल्लेख करता येईल.

**ऊसतोड कामगारांचे प्रकार :-** ऊसतोड कामगारांचे तीन प्रकार पडतात.

१) टायरगाडी कामगार (बेलजोडी बाळगून असलेले)

२) गाडीसेंटर कामगार (बैलगाडी बाळगुण असणारे)

३) डोकीसेंटर कामगार (डोक्यावरून ऊसमोळी वाहणारे)

पहिल्या प्रकारच्या ऊसतोड कामगार वर्गाकडे त्यांची स्वत:ची फक्त बैलजोडी उपलबध असते. त्यामुळे अशा प्रकारचे कामगार रू. १०% प्रतिदिन दरानेसंबंधीत साखर कारखान्याकडून टायरगाडी किरायाने घेतात व कारखान्यापासून अल्प अंतरावरील ऊस शेतीमधून ऊसाची साखर कारखान्यापर्यंत वाहतूक करतात.

दुसऱ्या प्रकारात ऊसतोड कामगार वर्गाकडे स्वत:च्या मालकीची बैलगाडी उपलब्ध असून कारखाना परिसरातील ऊसाची वाहतूक करतात किंवा प्रसंगी अंतर्गत व दूरस्थ अंतरावरील खराब अरूंद रस्त्यामुळे ट्रक ट्रॅक्टरच्या सोयीनूसार बैलगाडीने वाहतूक करून ट्रक/ट्रॅक्टरला साहयाक म्हणून कामे करतात. तिसऱ्या प्रकारचे ऊसतोड कामगार हे फक्त ऊसाच्या फडातून बैलगाडी/ट्रक/ट्रॅक्टर पर्यंत स्वत:च्या डोक्यावरून ऊस मोळीची वाहतूक करतात. म्हणून त्यांना डोकी सेंटर लेबर Doki Centre Labourers) असे म्हटले जाते.

*** ध्येय व उद्दिष्टये (Aims and Objectives)**

(१) मराठवाडा विभागची ऐतिहासिक पार्श्वभूमी पहाणे.

(२) संशोधन क्षेत्रातील हंगामी स्थलांतरित ऊसतोड. कामगारांच्या सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकणे.

(३) अभ्यास क्षेत्रातील हंगामी स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या स्थलांतराची कारणे अभ्यासणे.

* **अभ्यास क्षेत्र व विषयाची निवड :** मराठवाडा विभागात औरंगाबाद जालना, परभणी, नांदेड, लातूर, उस्मानबाद, बीड व हिंगोली या आठ जिल्ह्याचा समावेश होत असून औरंगाबाद हे शहर या विभागाचे मुख्यालय आहे. मराठवाड्याचे एकूण भौगोलीक क्षेत्र ६३,७७३ चौ.कि.मी. असून २०११ च्या जनगणनेनूसार येथील लोकसंख्या १,८७,२७,७४८ एवढी आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा प्राचीन काळापासून सर्वच दृष्टीने वैभवसंपन्न होता. परंतु येथील शेती, जलसिंचन, वाहतुक व दळणवळण आणि उदयोगाच्या वाढीसाठी शासकिय स्तराहून विशेष प्रयत्न झाले नाहीत. याचा परिणाम म्हणजे हा विभाग पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मागास राहिला आणि साधन ऊस उत्पादन क्षेत्राकडे ऊसतोड कामगार म्हणून विशिष्ट काळासाठी स्थलांतर करू लागला.



Scanned by CamScanner

प्रस्तुत ज्वलंत समस्येच्या अधारावर संशोधकाने स्थलांतरित ऊसतोड कामगाराच्या एकंदर जीवणवर होत असलेला परिणाम व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी हा अभ्यास करण्याचे ठरविले. या अभ्यासामुळे ऊसतोड स्थलांतरीत कामगारांसाठी व त्यांच्या पाल्यासाठी हे स्थलांतर, बेरोजगारी, दारिद्र्य आणि आर्थिक संपन्नतेचा अभाव असल्याने, आर्थिक समृध्दता आणि संसाधाची अनुकुलता प्राप्त होण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे सुचविली आहेत. यामुळे त्यांना आर्थिक लाभ मिळेल मुलांच्या शाळेतील गळतीचे प्रमाण कमी होऊ शकेल आणि एक सधन समाज तयार करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची मदत होईल.

**संशोधन पध्दती (Research Methodology) :**

प्रस्तुत संशोधन कार्यात मराठवाड्यातील ऊसतोड कामगाराच्या सामाजिक समस्याचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची माहिती संकलीत केली आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती ही मुलाखत अनुसुचीच्या व चर्चेच्या माध्यमातून गोळा केली आहे यासाठी मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाला योग्य प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून एकूण ६०० ऊसतोड कामगार निवडले असून बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारासाठी महाराष्ट्रात प्रसिध्द असल्याने या जिल्ह्यातून सर्वात जास्त (२००) ऊसतोड कामगार निवडले असून त्या खालोखाल उस्मानाबाद (१००) तर इतर सहा जिल्ह्यातून प्रत्येकी (५०) ऊसतोड कामगारांची निवड केली आहे.

दुय्यम स्वरूपाची माहिती ही शासकिय कार्यालये उदा :- विभागीय साखर आयुक्त, साखर संघ प्रत्येक जिल्ह्यातील राजपत्र यांचा आधार घेतला असून याशिवाय ग्रंथालयीन सामुग्रीमध्ये काही पीएच.डी. प्रबंध एम.फील शोध निबंध व संशोधन लेखांचा आधार घेतला आहे.

प्रस्तुत संशोधनात सर्वसामान्याना ज्ञात होण्यासाठी संकलीत माहितीचे सरासरी टक्केवारी या सांख्यिकीय तंत्राचा वापर करून त्याचे विश्लेषन व आलेखाच्या साहयाने प्रदर्शीत केले आहे.

*** परिणाम व चर्चा : (Result and Discussion)**


हंगामी स्थलांतरीत ऊसतोड कामगार व त्यांच्या सामाजिक-आर्थिक समस्या हा विषय खूपच व्यापक व बहुआयामी आहे. कारण ऊसतोड कामगार हा घटक जो कार्यरत असतो त्या क्षेत्राशी व कार्याशी, निगडीत जेवढे घटक व बाबी येतात त्या सर्वांचा अंतर्भाव या संज्ञेत होतो उदा :- ऊसतोड कामगारांचा संबंध मुकदम, साखर उद्योग, ऊस उत्पादक शेतकरी वाहतुक व दळणवळण व्यवस्था या सर्वांसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा तसेच ऊसतोड कामगार हा असंघटीत वर्ग असून त्यांच्या सामाजिक सुरक्षा. मुलांचे शिक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पशुधनाची काळजी ऊस वाहतूक व ऊसतोड करतांना होणारे अपघात, आजार तसेच मुळगावी असलेली सामजिक आर्थिक व्यवस्था या सर्वांचा विचार केल्यास ऊसतोड कामगार व त्यांच्या सामाजिक-आर्थिक समस्या हा विषय किती व्यापक आहे. याची कल्पना येते.

**तक्ता क्र. १**

**मुलाखतीसाठी निवडलेली मराठवाड्यातील जिल्हा निहाय हंगामी स्थलांतरित ऊसतोड कामगारांची संख्या**

| जिल्हे | कामगारांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बीड | २०० | ३३.३३ |
| उस्मानाबाद | १०० | १६.५० |
| लातूर | ५० | ८.३६ |
| नांदेड | ५० | ८.३६ |
| हिंगोली | ५० | ८.३६ |
| परभणी | ५० | ८.३६ |
| जालना | ५० | ८.३६ |
| औरंगाबाद | ५० | ८.३६ |
| एकूण | ६०० | १००.०० |

तक्ता १ मध्ये मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांची संख्या जिल्हा निहाय दर्शविली आहे. अभ्यास क्षेत्रातील निवड घटकाची प्राथमिक माहिती प्राप्त करण्यासाठी आठही जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची निवड स्तरित या दृच्छिक नमुना पध्दतीने केली असून त्यासाठी एकूण ६०० ऊसतोड कामगार निवडली आहेत. बीड जिल्ह्यातून सर्वाधीक २०० तर उस्मानाबाद जिल्ह्यातुन १०० कामगार निवडले आहेत. ३०० कामगार हे उर्वरीत ६ जिल्ह्यातुन प्रत्येक ५० या प्रमाणे निवडले बाजुच्या स्तंभालेखावरून याबाबतची स्पष्ट कल्पना येते.





**तक्ता क्र. २**

**अभ्यास क्षेत्रातील हंगामी स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलांची मुळ गावी तसेच कामाच्या ठिकाणाची शालेय उपस्थिती.**

| शालेय स्थिती | मूळगावी संख्या | टक्केवारी | कामाच्या ठिकाणी कामाच्या संख्या | कामाच्या ठिकाणी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | ०१७ | १०.६ |
| शाळेत जाणारी मुले | ४०५ | ४४.४ | ८५ | ८९.४ |
| शाळेत न जाणारी मुले | ५०७ | ५५.६ | ० | ० |
| | ९१२ | १००.०० | १९२ | १०० |

वरील तक्ता नं. २ आणि आकृतीमध्ये अभ्यास क्षेत्रातील ऊसतोड कामगारांच्या मुलांची शाळेतील गळतीचे प्रमाण किती भयावह आहे हे दिसून येते. मूळगावी शाळेत जाणाऱ्या मुलांचे शेकडा प्रमाण ४४ एवढे असून कामाच्या ठिकाणी हेच प्रमाण १०.६% आहे. तर शाळेत न जाणाऱ्या मुलांचे प्रमाण मुळगावी ५५% तर कामाच्या ठिकाणी ८९.४ आहे याचाच अर्थ असा की, शाळेत न जाणाऱ्या मुलांचे प्रमाण दोन्ही ठिकाणचे खूपच जास्त आहे. मूळ गावी गळतीच्या प्रमाणापेक्षा कामाच्या ठिकाणचे गळतीचे प्रमाण जास्त दिसून आले याचे प्रमुख कारण म्हणजे कामाच्या ठिकाणी जवळ शाळैची अथवा साखर शाळेची व्यवस्था नाही.

तसेच जिथे शाळा आहेत तेथे कामगारांच्या राहण्याच्या ठिकाणापासून दूर अंतरावर असल्याने मुले शाळेत जात नाहीत. याशिवाय ऊसतोड कामगारांचा मुक्काम एकाच ठिकाणी नसून ते ऊस तोडणीच्या कामानूसार व उपलब्धतेनूसार सतत स्थलांतर करावे लागते. त्यांची घरेही कामाच्या ठिकाणी तात्पुरत्या/अस्थायी स्वरूपाची असतात. त्यामुळे मुलांना शाळेत जाण्यासाठी आवश्यक असणारे वातावरण/परिस्थिती नसते हे यावरून दिसून आले.




**तक्ता क्र. ३**

**अभ्यासक्षेत्रातील हंगामी स्थलांतरित ऊसतोड कामगारांना कामाच्या ठिकाणी झालेले विविध अपघात व जखमांची माहिती दर्शवणारा तक्ता**


| घटना | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अपघात | ५० | ८.३३ |
| कोयता जखम | १४० | २३.३३ |
| खोडण्यामुळे जखम | १७८ | २९.६६ |
| मधमाशा दंश | १३० | २१.६६ |
| इतर दंश/चावा | ०१२ | ०२.०० |
| इजा न झालेले | ०९० | १५.०० |
| एकूण | ६०० | ९९.९८ |

स्त्रोत : सर्वेक्षणावर आधारीत.



Scanned by CamScanner

वरील तक्त्यामध्ये हंगामी स्थलांतरित ऊसतोड कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी झालेले विविध अपघात व जखमांचे विवरण दिलेले आहे. यामध्ये जास्त प्रमाण (३०%) खोडल्यामुळे जखमा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या खालोखालच कोयत्यामुळे म्हणजेच (२३%) जखमा व मधमाशाचा दंश झाल्याचे आढळते. याशिवाय अपघात (८%), इतर दंशचावा (२%) तर इजा न झालेल्याचे १५% प्रमाण दिसून आले. अशा प्रकारे अपघात जखमांमुळे कामगाराच्या कामावर व आरोग्यावर असा दूहेरी परिणाम होतो.




**निष्कर्ष :**

मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्र ६३७७३ चौ.किमी असून ते महाराष्ट्राच्या सुमारे २१% भरते. सन २०११ च्या जनगननेप्रमाणे अभ्यासक्षेत्राची एकूण लोकसंख्या १ कोटी ८७ लाख असून ती महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे १७% आहे. त्यापैकी क्षेत्र अभ्यासापेकी निवडलेल्या ऊसतोड कामगारांची आठ जिल्ह्यातून ६०० जणाची निवड करण्यात आली.

* संशोधन क्षेत्रातील कामगारांच्या मूलांचे शाळेतील गळतीचे प्रमाण (Dropout) किती भयावह आहे तक्ता दोनवरून समजते. मुळ गावी शाळेत जाणाऱ्याचे शे प्रमाण ४४% असून कामाच्या ठिकाणी हेच प्रमाण १०% आहे. तर दोन्ही ठिकाणी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. मुळ गावापेक्षा कामाच्या ठिकाणचे गळतीचे प्रमाण जास्त आहे.

* संशोधन क्षेत्रात ऊसतोड कामगारांना झालेले विविध अपघातनंतर कामाच्या ठिकाणी कामगारांना ऊस खोडाची दूजा होऊन पायांना बऱ्याचवेळा जखमा होत असतात. तसेच सर्पदंश, विंचू दंश विषारी माशा क्रम यांच्या विषामुळे त्यांच्या हालअपेष्टा होतात. वेळेवर इलाज व औषधोपचारही उपलब्ध होत नाही. टोळी प्रमुखाकडून कसलेही संरक्षण मीळत नाही.

*** शिफारशी :**

ऊसतोड कामगार हा असंघटीत असून त्यांचे विविध प्रश्न सोडवणूकीसाठी त्यांच्यात जिल्हास्तरावर संघटना स्थापन करून त्यांची नोंदणी करण्याची जबाबदारी शासनाने अथवा साखर कारखान्यांनी दयावी.

* शासनातर्फे प्रत्येक कारखान्यांच्या परिक्षेत्रात ऊसतोडणीसाठी येणाऱ्या कामगारांची संख्या व स्थलांतराचा ओघ लक्षात घेऊन कामगारांच्या अपत्यांच्या प्रमाणात साखर शाळा सुरू कराव्यात की, ज्यामुळे त्यांच्या मुलांची शाळेतील गळती कमी होईल.

* उसतोड कामगारांचा जीवन विमा उतरवून साखर कारखान्याना त्यांच्याविमा हप्तयांचा भरणा करण्याचे निर्देश द्यावेत व त्याचे अनुपालन होते की नाही हे पहाण्यासाठी विशेष यंत्रणा उभी करावी.

*** संदर्भ सूची :**

१) डॉ. रोडे सोमनाथ (जून-२०११) मराठवाड्याचा इतिहास.
२) डॉ. करपे राजाभाऊ (जुन-२०१२) मराठवाड्यातील शेतकरी चळवळ - चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
३) डॉ. गुळवे मोहन, प्रा. गायकवाड जोगेंद्र (जुलै-२००५) लोकसंख्या भूगोल कैलाश पब्लिकेशन, औरंगपूरा औरंगाबाद.
४) काटे पी.व्हि. (जून-१९९९) मराठवाड्याचा इतिहास
५) माने सि.यु. तिडके एसएस (३ ऑक्टोबर-२०१३) विकलो सायन्स रिसर्च जर्नल (खंड १, अंक १२)

□□□



Scanned by CamScanner